# इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये विपुल संधी; तरुणांनी पुढे यावे..!

## उद्योजक प्रवीण जेम्स यांचे प्रतिपादन | साखळी सरकारी महाविद्यालयात विशेष व्याख्यान

टीम दैनिक हेराल्ड


**साखळी, दि. १८ :** सध्याच्या काळात 'इव्हेंट' हा प्रत्येकाच्या जगण्याचा भाग बनलेला आहे. इव्हेंटचे आयोजन करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांना प्रचंड मागणी असून इव्हेंट मॅनेजमेंट उद्योग म्हणून पुढे येत असल्याने या क्षेत्रात करिअरची विपुल संधी असून तरुणांनी पुढे यावे आणि या क्षेत्रात आपले करिअर घडवावे, असे प्रतिपादन उद्योजक, इव्हेंट मॅनेजमेंटमधील तज्ज्ञ आणि साखळी सरकारी महाविद्यालयाचे माजी सरचिटणीस प्रवीण जेम्स यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभागाने दि. १३फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या 'पदवीनंतर इव्हेंट मॅनेजमेंटमधील करिअरची संधी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा.प्रशांत भोसले, व्याख्यानाचे संयोजक प्रा. कॉनराड डिसोझा आदी मान्यवर उपस्थित होते. गौरी माळी यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. साईश राजपूत यांनी प्रमुख वक्ते प्रवीण जेम्स यांचा परिचय करून दिला. प्राचार्य नामदेव गावस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ऐश्वर्या मातोणकर यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार उर्वशी पंडित यांनी मानले. एकूण ५८ विद्यार्थी या व्याख्यानासाठी उपस्थित होते.

प्रवीण जेम्स म्हणाले की इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये तरुणांना करिअरची प्रचंड संधी आहे. या क्षेत्रात वेळला खूप महत्त्व असते. त्यामुळे वेळेचे नियोजन करता यायला हवे. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वत:च्या जीवनातील वेगवेगळे अनुभव विशद केले. इव्हेंट मॅनेजमेंटमधील नवे ट्रेंड आणि यश याबद्दल प्रवीण जेम्स यांनी विद्यार्थ्यांना नवी दृष्टी दिली. कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी, त्यासंदर्भातील कौशल्ये यावरही त्यांनी प्रकाशझोत टाकला.

इव्हेंट मॅनेजमेंट विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे आयोजन आणि अंमलबजावणी करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, विद्यार्थ्यांना इव्हेंट मॅनेजमेंटमधील करिअरची संधी आणि त्यासाठी आवश्यक कौशल्यांची माहिती प्राप्त व्हावी, यासाठी या विशेष व्याख्यानाचे आयोजन केलेले होते, असे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी सांगितले.



**साखळी : मुख्य मार्गदर्शक प्रवीण जेम्स, प्राचार्य डॉ नामदेव गावस, प्रा.प्रशांत भोसले, प्रा. कॉनराड डिसोझा व सहभागी विद्यार्थी.**

# बोरीतील विद्यार्थ्यांची गोशाळेला भेट

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१८:** संपूर्ण भारतातील वाचवलेल्या, आजारी, जखमी आणि सोडून दिलेल्या जनावरांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या धर्मादाय कार्यासाठी ध्यान फाऊंडेशन जगभरात ओळखली जाते आणि देशभरातील ४८ गोशाळा आणि प्राण्यांच्या निवाऱ्यांमध्ये %0,000 पेक्षा जास्त प्राणी (प्रामुख्याने गुरे) राहतात.

१५ फेब्रुवारी रोजी वाणिज्य व पर्यावरण अभ्यास विभाग, स्वामी विद्याप्रसारक मंडळ वाणिज्य महाविद्यालय, बोरी-फोंडा यांच्या तर्फे प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ध्यान फाऊंडेशन गोशाळा, जांबावली येथे सहलीचे आयोजन करण्यात आले होते. जांबावली येथील ध्यान फाऊंडेशन गोशाळेत शाश्वत शेती पद्धती आणि पशुव्यवस्थापनाचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना शेतीव्यवसायाचे व्यावहारिक ज्ञान मिळावे, हा या फिल्ड ट्रिपचा उद्देश होता.

ध्यान फाऊंडेशनमध्ये संपूर्ण गोव्यातून अपघातातून सुटका करण्यात आलेली १३०० गुरे आहेत, त्यांची योग्य काळजी घेतली जाते आणि त्यांना निवाराही दिला जातो. पशुकल्याण आणि शाश्वत शेतीमध्ये गोशाळांचे महत्त्व समजावून सांगितल्यावर विद्यार्थी थक्क झाले. शाश्वत शेती आणि ग्रामीण उद्योजकतेत गोशाळांची भूमिका आणि पशुकल्याण उपक्रमांचे आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना शेती पद्धत आणि शाश्वत शेतीची प्रत्यक्ष ओळख झाली. नैतिक पशुधन व्यवस्थापनाचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनातील गोशाळांच्या भूमिकेवर भर देत विद्यार्थ्यांना शेतीवर आधारित व्यवसायाच्या संधी शोधण्याची प्रेरणा दिली. . ध्यान फाऊंडेशन हे ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया आणि गोवा स्टेट ॲनिमल वेल्फेअर बोर्ड आणि डीएसपीसीए दक्षिण गोवा यांच्या सोबत देखील सक्रिय आहे.

**OFFICE OF THE MAMLATDAR TISWADI TALUKA PANAJI, GOA**

Mutation Case No. COMP / Mutation / 43271 / Ambarim

1. Brice Barreto 2. Edlyn Effie Barreto 3. Maria Basilia Socorro Helena Mota, All R/o H. No. 14, Ambarim Chorao, Chorao Tiswadi, North Goa 403102 ....Applicant

V/s

1. Antonio Francisco Jose Barreto 2. Mario Leo Barreto 3. Andrea Faney Fernandes ....Opponents

To The Opponents / Their Legal Heirs

**PUBLIC NOTICE**

Application received from Brice Martin Barreto and Edlyn Effie Barreto, Both R/o H No 14, Ambanm Chorao, Chorao, Tiswadi, North, Goa, 403102 requesting to include the name of Brice Martin Barreto, Edlyn Effie Barreto and Maria Basilia Socorro Helena Mota in Occupant Column of form I and XIV after deleting name of Antonio Francisco Barreto in Occupant Column of form I and XIV under Sy No. 3/7 of Village Ambarim of Tiswadi Taluka as the applicants has acquired right on landed property as per Inventory Proceedings No. 166/2023/E Dated: 19/03/2024 in the Court of the Civil Judge Junior Division, Panaji.

And whereas, the notice in the Form X (under Rule 10) of the L.R.C. 1968 issued to the opponents at the last known address return unserved back with postal remark "Deceased" unserved as the applicant does not know the detail addresses of the legal heirs of the opponents and their further addresses.

And whereas the applicant has prayed vide his application dated 30.01.2025 for substituted service by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20 (1A) of C.P.C. 1908 as the applicant does not know the legal heirs of the deceased nor their addresses.

Now therefore, if any person is having any objection to the above said mutation entry are called upon to submit their objection to me either orally or in writing within fifteen days from the date of publication of this notice.

Please note that if No Objection is received by me within said period of fifteen days, it shall be presumed that they agree to the mutation entry and the mutation will be certified on any day after the above period is over.

Panaji, Dated: 06/02/2025

Sd/- **Priya Samant @ Kamat** Seal
Joint Mamlatdar IV of Tiswadi Taluka
H/C of Joint Mamlatdar V Tiswadi Taluka,Panaji, Goa

**OFFICE OF THE MAMLATDAR TISWADI TALUKA PANAJI, GOA**

Mutation Case No. COMP / Mutation / 43272, 42373, 43274, 43275 / Ambarim

1. Brice Barreto 2. Edlyn Effie Barreto 3. Maria Basilia Socorro Helena Mota, All R/o H. No. 14, Ambarim Chorao, Chorao Tiswadi, North Goa 403102 ....Applicant

V/s

1. Antonio Francisco Jose Barreto 2. Mario Leo Barreto 3. Andrea Faney Fernandes ....Opponents

To The Opponents / Their Legal Heirs

**PUBLIC NOTICE**

Application received from Brice Martin Barreto and Edlyn Effie Barreto Both R/o H No 14, Ambarim Chorao, Chorao, Tiswadi, North, Goa, 403102 requesting to include the name of Brice Martin Barreto, Edlyn Effie Barreto and Maria Basilia Socorro Helena Mota in Occupant Column of form I and XIV under Sy No. 3/8 of Village Ambarim of Tiswadi Taluka, under Sy No. 3/9 of Village Ambarim of Tiswadi Taluka, under Sy No. 3/10 of Village Ambarim of Tiswadi Taluka and under Sy No. 3/13 of Village Ambarim of Tiswadi Taluka as the applicants has acquired right on landed property as per Inventory Proceedings No. 166/2023/E Dated: 19/03/2024 in the Court of the Civil Judge Junior Division, Panaji.

And whereas, the notice in the Form X (under Rule 10) of the L.R.C. 1968 issued to the opponents at the last known address return unserved back with postal remark "Deceased" unserved as the applicant does not know the detail addresses of the legal heirs of the opponents and their further addresses.

And whereas the applicant has prayed vide his application dated 30.01.2025 for substituted service by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20 (1A) of C.P.C. 1908 as the applicant does not know the legal heirs of the deceased nor their addresses.

Now therefore, if any person is having any objection to the above said mutation entry are called upon to submit their objection to me either orally or in writing within fifteen days from the date of publication of this notice.

Please note that if No Objection is received by me within said period of fifteen days, it shall be presumed that they agree to the mutation entry and the mutation will be certified on any day after the above period is over.

Panaji, Dated: 06/02/2025

Sd/- **Priya Samant @ Kamat** Seal
Joint Mamlatdar IV of Tiswadi Taluka
H/C of Joint Mamlatdar V Tiswadi Taluka,Panaji, Goa

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA GOA**

Case No. JM-VI / TNC / NEG-DEC / u/s.7 / Candolim / 13 / 2024

Mr. Wasi Inamylhaq Ahmed, r/o H. No. 233, New Arradi, Candolim, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Vasudev Ganesh Kandolkar (Deceased) Through his legal heir 1. A) Mr. Ganesh Vasudev Candolkar (Deceased) Through his legal heir (i) Mr. Sudesh Ganesh Candolkar, r/o Anna Wado, Candolim, Bardez, Goa 1 B) Mr. Ramchandra Vasudev Candolkar 1C)Mr. Prabhakar Vasudev Candolkar 1D) Mr. Gurudas Vasudev Candolkar 1E) Mr. Chandrakant Vasudev Candolkar 1F) Mr. Satchit Vasudev Candolkar, All r/o Anna Vaddo, Candolim, Bardez, Goa ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To The Opponent

Whereas the applicant above named has made an application for tenancy negative declaration under section 7 of Goa, Daman & Diu Agricultural Tenancy Act 1964 in respect of Survey No. 191/11-B of Candolim Village in this Court against you.

And whereas the applicant vide his application dated 20/01/2025 has submitted that the notices issued to the opponent returned unserved and has therefore prayed for publication of notice by way of substitute service.

And whereas in my opinion this is fit case for publication under order V Rules 20(1)(A) of C.P.C. 1908 to publish the notice through local newspaper for vide publicity.

Now therefore, in terms of provision of the order V Rule 20(1)(A) for C.P.C. 1908, above opponents or their legal heirs are hereby called upon to appear in this court on **20.03.2025 at 3.00 pm** to answer the claim of the applicant. Take notice that in default of your appearance as aforesaid on the above date and time, the said application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 13th day of February 2025.

Sd/- **Saiesh S. Naik**
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka
Mapusa, Goa Seal

**CHANGE IN NAME**

I **JOEL D SOUZA** R/O H NO 333/1, VAILANKANI VILLA, ALTO PILERNE, BARDEZ, GOA like to change my name from **JOEL JOSEPH DE SOUZA** to **JOEL D SOUZA.** Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **JOEL D SOUZA**

**VILLAGE PANCHAYAT BETQUI - CANDOLA, TAL: PONDA – GOA**

Ref.No.VP/BC/E-Tender /2024-2025/ 1409
Dated:- 18/02/2025

**TENDER NOTICE**
**(e-TENDERING MODE ONLY)**

1. The last date of online application and Submission of tender is **28/02/2025 upto 12.00 p.m..**
2. The date, time and place of opening of online tender is **03/03/2025 at 11.00 a.m.** at V.P. Office Betqui Candola Goa.


For more details please contact the Office of the Village Panchayat Betqui Candola Goa.
For participation and other details visit on e-tendering website
**https://eprocure.goa.gov.in**

Sd/-
( Vishant L. Naik ) Seal
Sarpanch,
V.P. Betqui – Candola, Ponda -Goa

# गोमंतकीय संस्कृतीने सातारावासीय मंत्रमुग्ध

टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १७ :** मराठी विभाग, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी आणि श्री छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाने घडविलेल्या गोमंतकीय संस्कृतीच्या दर्शनाने सातारावासीय मंत्रमुग्ध झाले. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा यांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील मराठी विभागातील १३ विद्यार्थी व एक प्राध्यापक सहभागी झालेले होते. या संपूर्ण विद्यार्थ्यांचे नेतृत्व मराठी विभागातील प्रा. सुशा होंडकर यांनी केले. यावेळी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ. सुभाष वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना रयत शिक्षण संस्था व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाविषयी माहिती दिली.



विद्यार्थ्यांनी पारंपरिक गाऱ्हाणे, शिमगोत्सवातील लोकगीते, गोमंतकातील कवींच्या कविता, गवळण, कोंकणी भाषेतील गीते, धालो यांचे अद्वितीय आणि अद्भुत सादरीकरण करून सातारकरांना मंत्रमुग्ध केले. यावेळी प्रा. सुशा होंडकर यांनी गोमंतकीय संस्कृतीविषयी अभ्यासपूर्ण माहिती दिली.

'जागतिक भाषा साहित्यात प्रतिबिंबित वंचित व शोषितांचे जीवन' या विषयावरील परिसंवादात साखळी सरकारी महाविद्यालयातील मराठी विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. तसेच सातारा परिसरातील छत्रपती शिवाजी संग्रहालय, सज्जनगड, अजिंक्यतारा किल्ला आदी ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. विद्यार्थी व प्राध्यापक यांना साखळी सरकारी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विभाग प्रमुख प्रो.डॉ. स्नेहा महांबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा, वास्को द गामा , स्वतंत्र पथ, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा ४०३८०२
दूर.क्र. ०८३२-२५१२४१०, फॅक्स क्र. २५१२४१०
ईमेल : VASCOD@BANKOFBARODA.CO.IN

**कर्जदारास नोटीस**
**(सरफासी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (२) खाली )**

**वास्कोडी/एनपीए-एडीव्ही-०१/२०२४-२५/७९८६/२९०** — **रजिस्टर्ड एडी** **दि. १०-०१-२०२५**

प्रति,
**श्री. पर्पेच्युआ एस गुर्जाव,** घर क्र. ३५३,कावेरी हॉटेलसमोर, वॉर्ड क्र. १२, पिशे डोंगरी, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा पीन ४०३८०२. संपर्क क्र. **८३९०७९२६४६**
हमीदारास नोटीस : प्रति, **श्रीमती रोझालिनो गुर्जाव,** घर क्र. २६९, कावेरी हॉटेलसमोर, पिशे डोंगरी, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा पीन ४०३८०२. संपर्क क्र. **९८२३७४७२०७**
प्रति, **श्री. मारियानो पेद्रो गुर्जाव,** घर क्र. २६९, कावेरी हॉटेलसमोर, पिशे डोंगरी, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा पीन ४०३८०२. संपर्क क्र. **९९७५६२५१७८.**
प्रति, **श्री. डोमिंगो गुर्जाव,** घर क्र. २६९, कावेरी हॉटेलसमोर, पिशे डोंगरी, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा पीन ४०३८०२. संपर्क क्र. **९०४९९२०४६७**
प्घरति, **श्री. जसिंतो गुर्जाव,** घर क्र. ३५३, कावेरी हॉटेलसमोर, वॉर्ड क्र. १२, पिशे डोंगरी, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा पीन ४०३८०२. संपर्क क्र. **९८२३७४५१७८.**
प्रिय महोदय,
**विषय : आमच्या वास्को द गामा शाखेतील कर्ज सुविधा.**
१. विविध कर्ज सुविधा मंजूर करणारे आमचे मंजुरी पत्र दि. **०५-१२-२०१७** व मंजुरीच्या अटींचा संदर्भ घ्यावा. वरील मंजुरीन्वये तुम्ही त्यासाठी सुरक्षा पुरवून कर्ज सुविधा घेतल्यात व त्या वापरायला सुरवात केली ज्याचे येथे वर्णन केले आहे. विविध कर्ज/कर्ज सुविधांतील सद्य देय व अशा दायित्वासाठी तयार केलेला सुरक्षा हितसंबंध खालीलप्रमाणे आहेत :

| सुविधेचे स्वरुप व प्रकार | मर्यादा (रक्कम रुपयांत) | व्याज दर | दि. १०-०१-२०२५ रोजी देय (दि. ३०-०९-२०२४ पासून न आकारलेले/न लावलेले व्याज व त्यावरील ईंर चार्जेस वगळून) (रक्कम रुपयांत) |
|---|---|---|---|
| मुदत कर्ज | रु. १९,५७,५००.००/- | १२.३५७ | रु. ३,९८,८३१.००/- |
| एकूण एक्स्पोजर | रु. १९,५७,५००.००/- | | रु. ३,९८,८३१.००/- |

**सुरक्षांच्या लघु वर्णनासह सुरक्षा करार : दक्षिण गोवा जिल्हातील तालुका व उपनोंदणी जिल्हा मुगावच्या मुरगाव नगरपालिका हद्दीत बायणा येथे असलेल्या वास्को शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. १५२ च्या चलता क्र. ३२२ खाली सर्वेक्षित ४५०.०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीचा एक स्वतंत्र व वेगळा प्लॉट.**

**चतु:सीमांसह गहाणवट मालमत्तांचा तपशील**
**अनुसूची-१**

दक्षिण गोवा जिल्हातील तालुका व उपनोंदणी जिल्हा मुगावच्या मुरगाव नगरपालिका हद्दीत बायणा येथे असलेल्या वास्को शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. १५२ च्या चलता क्र. ३२२ खाली सर्वेक्षित ४५0.00 चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीचा एक स्वतंत्र व वेगळा प्लॉट.जो मडगाव येथील सालसेत भूनोंदणी कार्यालयात वर्णिलेला नाही आणि क्र. १३१५ खाली मुगावच्या मात्रिजखाली तालुका महसूल कार्यालयात नोंदवलेल्या संपूर्ण मालमत्तेचा सदर प्लॉट हा पूर्वेकडील भाग आहे ज्याच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस : पीटी शीट क्र. १५२ च्या चलता क्र. २४१,२४५ खालील मालमत्ता, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : पीटी शीट क्र. १५२ च्या चलता क्र. २६२ खालील मालमत्ता, दक्षिणेस : पीटी शीट क्र. १५५ च्या चलता क्र. १ खालील मालमत्ता.
२. आपणास माहित आहेच की, सप्टेंबर २०२४ महिन्यापासून वरील कर्ज/देय रकमांच्या व्याजाच्या परतफेडीत तुम्ही बुडवेगिरी केली आहे. तसेच तुम्ही मुदत कर्ज/मागणी कर्जाचे हप्ते भरण्यातही **३०-०९-२०२४** रोजी व त्यानंतरही बुडवेगिरी केली आहे.
३. तुम्ही ही बुडवेगिरी केल्याने रिझर्व बँक इंडियाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तुमचे कर्ज खाते हे अकार्यक्षम (नॉन परफार्मिंग) मत्ता म्हणून **२९-१२-२०२४** रोजी (एनपीए म्हणून वर्गीकृत केल्याची तारीख) वर्ग करण्यात आले.वारंवार विनंत्या व मागणी करूनही त्यावरील व्याजासह देय कर्ज रकमेचा भरणा तुम्ही केलेला नाही.
४. वरील परिच्छेद १ मध्ये दिलेल्या विविध सुरक्षांद्वारे सुरक्षित केलेल्या कर्ज सुविधांसंबंधी तुमच्या दायित्वांची पूर्ती करण्यात तुम्हास अपयश आल्याने व तुमचे कर्ज खाते अकार्यक्षम म्हणून वर्ग करण्यात आल्याने सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (२) खाली आम्ही तुम्हाला नोटीस देत आहोत आणि ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत दि. **३०-०९-२०२४** पासून न आकारलेले/न लावलेले व्याज व त्यावरील इतर चार्जेस वगळून एकूण **रु. ३,९८,८३१.००/-** (रु. तीन लाख अठ्ठ्याण्णव हजार आठशे एकतीस फक्त) या दायित्वांचा भरणा करण्याच्या तारखेपर्यंत त्यावर साठल्लेया व्याजास पूर्ण भरणा करावा अन्यथा सदर कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) खाली प्रदान झालेल्या एखाद्या वा सर्व अधिकारांचा वापर करण्यास आम्ही मुक्त राहू.
५. कृपया नोंद घ्या की, पूर्ण भरणा होईपर्यंत प्रत्येक कर्ज सुविधेवर वरील परिच्छेद १ अनुसार विशिष्ट दराने त्यावर व्याज साठत राहील.
६. सदर कायद्याच्या कलम १३ मधील उपकलम १३ कडे आम्ही तुमचे लक्ष वेधतो ज्यामुळे आमची लेखी संमती घेतल्याखेरीज विक्री, भाडेपट्टा वा अन्य कोणत्याही व्यवहाराद्वारे (नेहमीच्या पद्धतींखेरीज) वरील परिच्छेद १ मधील सुरक्षित मत्ता हस्तांतरित करण्यापासून तुम्हाला मज्जाव करण्यात येते आहे. सदर कायद्याच्या कलम १३(१३) मधील वरील तरतुदींचे उल्लघन झाल्यास सदर कायद्याच्या कलम २९ खाली तो एक शिक्षापात्र गुन्हा होईल, हे लक्षात घ्यावे.
%. सदर कायद्याच्या कलम १३ मधील उपकलम (८) कडे आम्ही तुमचे लक्ष वेधतो ज्यामुळे सदर सुरक्षित मत्ता पुन्हा मिळवण्यासाठी जाहीर लिलावाची नोटीस/प्रस्ताव मागवून/निविदा मागवून/खाजगी निविदा मागवण्यासाठीची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याच्या कारखेअगोदर कोणत्याही वेळी बँकेस देय असलेल्या सर्व रकमेचा भरणा त्यावरील चार्जेस व खर्चासह करावा.
८. कृपया नोंद घ्यावी की, वरील मागणी सूचना ही कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय आहे व आम्हास देय असलेल्या रकमेसंबंधी अधिक मागण्या करण्याच्या हक्कासह कोणत्याही मर्यादेसह जी आम्हासा आहे त्या कोणतेही अधिकार वा उपायांना सोडून न देता ते वापरले जातील.

**तुमचे विश्वासू,**
**दिनांक : १०-०१-२०२५**
**ठिकाण : वास्को द गामा, गोवा.**
**(श्री. ऑस्टीन जे एम डी आल्मेदा)**
**मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी**

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा, वास्को द गामा , स्वतंत्र पथ, वास्को द गामा, दक्षिण गोवा, गोवा ४०३८०२
दूर.क्र. ०८३२-२५१२४१०, फॅक्स क्र. २५१२४१०
ईमेल : VASCOD@BANKOFBRODA.CO.IN

**कर्जदारास नोटीस**
(सरफासी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (२) खाली )

**वास्कोडी/एनपीए-एडीव्ही-०१/२०२४-२५/२२६३** — **रजिस्टर्ड एडी** **दि. १३-०१-२०२५**

प्रति,
**श्री. ब्रायन जोसेफ डायस** (कर्जदार), बर्नार्डो डायस याचा मुलगा, १००%/ए, सिसोर्दा लोटली, सालसेत, दक्षिण गोवा, गोवा पीन-४०३%१८. . संपर्क क्र. **९८५०४५२३१६**
प्रति,
**श्रीमती आंतोनेता डिमेलो** (सह-कर्जदार), १००%/ए, सिसोर्दा लोटली, सालसेत, दक्षिण गोवा, गोवा पीन-४०३%१८. . संपर्क क्र. **८८०५५८५०८६**
**हमीदारास नोटीस : प्रति, श्री. हिलारिओ जस्टीन रॉड्रिक्स, फ्लॅट क्र. जी-१-ए, अवे मारिया अपार्टमेंट्स, पीडब्ल्यूडी ऑफिस मागे, सिन्क्रो हॉटेलजवळ, फातोर्डा, सालसेत दक्षिण गोवा पीन ४०३६०२ दूर.क्र. ९८५०४५२३१६.**
**प्रिय महोदय,**
**विषय : आमच्या वास्को द गामा शाखेतील कर्ज सुविधा.**
१. विविध कर्ज सुविधा मंजूर करणारे आमचे मंजुरी पत्र क्र. बीओबी/एडीव्ही दि. ०५-०९-२०१% व मंजुरीच्या अटींचा संदर्भ घ्यावा. वरील मंजुरीन्वये तुम्ही त्यासाठी सुरक्षा पुरवून कर्ज सुविधा घेतल्यात व त्या वापरायला सुरवात केली ज्याचे येथे वर्णन केले आहे. विविध कर्ज/कर्ज सुविधांतील सद्य देय व अशा दायित्वासाठी तयार केलेला सुरक्षा हितसंबंध खालीलप्रमाणे आहेत :

| सुविधेचे स्वरुप व प्रकार | मर्यादा (रक्कम रुपयांत) | व्याज दर | दि. १३-०१-२०२५ रोजी देय (दि. १२-१०-२०२४ पासून न आकारलेले/न लावलेले व्याज व त्यावरील इतर चार्जेस वगळून) (रक्कम रुपयांत) |
|---|---|---|---|
| बडोदा गृह कर्ज ०४९३०६०००२२६३ | रु. ३०,४०,०००.००/- | ९.३५% | रु. २७,४७,४२०.००/- |
| एकूण एक्स्पोजर | रु. ३०,४०,०००.००/- | | रु. २७,४७,४२०.००/- |

**सुरक्षांच्या लघु वर्णनासह सुरक्षा करार :** दक्षिण गोवा जिल्हातील मुरगाव तालुकामधील सांकवाळ गावत असलेल्या उमिया हाबीटाट या संकुलातील बिल्डींग क्र. बी मधील पाचव्या मजल्यावरील ८४.५० चौ.मी. सुप रबिल्ट अप क्षेत्रफळ असलेला फ्लॅट क्र. बी-५०५ चे समभाग गहाणवट.

**चतु:सीमांसह गहाणवट मालमत्तांचा तपशील**
**अनुसूची-१**

दक्षिण गोवा जिल्हातील मुरगाव तालुकामधील सांकवाळ गावत असलेल्या उमिया हाबीटाट या संकुलातील बिल्डींग क्र. बी मधील पाचव्या मजल्यावरील ८४.५० चौ.मी. सुपरबिल्ट अप क्षेत्रफळ असलेला फ्लॅट क्र. बी-५०५ . ज्याच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस : फ्लॅट क्र. बी-५०४, पश्चिमेस : सदर मालमत्तेचा सेटबॅक, उत्तरेस :ब्लॉक बी चा जिना, दक्षिणेस : सदर मालमत्तेचा सेटबॅक.
२. आपणास माहित आहेच की, ऑक्टोबर २०२४ महिन्यापासून वरील कर्ज/देय रकमांच्या व्याजाच्या परतफेडीत तुम्ही बुडवेगिरी केली आहे. तसेच तुम्ही मुदत कर्ज/मागणी कर्जाचे हप्ते भरण्यातही **१२-१०-२०२४** रोजी व त्यानंतरही बुडवेगिरी केली आहे.
३. तुम्ही ही बुडवेगिरी केल्याने रिझर्व बँक इंडियाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तुमचे कर्ज खाते हे अकार्यक्षम (नॉन परफार्मिंग) मत्ता म्हणून१०-०१-२०२४ रोजी (एनपीए म्हणून वर्गीकृत केल्याची तारीख) वर्ग करण्यात आले.वारंवार विनंत्या व मागणी करूनही त्यावरील व्याजासह देय कर्ज रकमेचा भरणा तुम्ही केलेला नाही.
४. वरील परिच्छेद १ मध्ये दिलेल्या विविध सुरक्षांद्वारे सुरक्षित केलेल्या कर्ज सुविधांसंबंधी तुमच्या दायित्वांची पूर्ती करण्यात तुम्हास अपयश आल्याने व तुमचे कर्ज खाते अकार्यक्षम म्हणून वर्ग करण्यात आल्याने सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (२) खाली आम्ही तुम्हाला नोटीस देत आहोत आणि ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत दि. **१२-१०-२०२४** पासून न आकारलेले/न लावलेले व्याज व त्यावरील इतर चार्जेस वगळून एकूण **रु.२%,४%,४२०.००/-** (रु. सत्तावीस लाख सत्तेचाळीस हजार चारशे वीस फक्त) या दायित्वांचा भरणा करण्याच्या तारखेपर्यंत त्यावर साठल्लेया व्याजास पूर्ण भरणा करावा अन्यथा सदर कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) खाली प्रदान झालेल्या एखाद्या वा सर्व अधिकारांचा वापर करण्यास आम्ही मुक्त राहू.
५. कृपया नोंद घ्या की, पूर्ण भरणा होईपर्यंत प्रत्येक कर्ज सुविधेवर वरील परिच्छेद १ अनुसार विशिष्ट दराने त्यावर व्याज साठत राहील.
६. सदर कायद्याच्या कलम १३ मधील उपकलम १३ कडे आम्ही तुमचे लक्ष वेधतो ज्यामुळे आमची लेखी संमती घेतल्याखेरीज विक्री, भाडेपट्टा वा अन्य कोणत्याही व्यवहाराद्वारे (नेहमीच्या पद्धतींखेरीज) वरील परिच्छेद १ मधील सुरक्षित मत्ता हस्तांतरित करण्यापासून तुम्हाला मज्जाव करण्यात येते आहे. सदर कायद्याच्या कलम १३(१३) मधील वरील तरतुदींचे उल्लघन झाल्यास सदर कायद्याच्या कलम २९ खाली तो एक शिक्षापात्र गुन्हा होईल, हे लक्षात घ्यावे.
%. सदर कायद्याच्या कलम १३ मधील उपकलम (८) कडे आम्ही तुमचे लक्ष वेधतो ज्यामुळे सदर सुरक्षित मत्ता पुन्हा मिळवण्यासाठी जाहीर लिलावाची नोटीस/प्रस्ताव मागवून/निविदा मागवून/खाजगी निविदा मागवण्यासाठीची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याच्या कारखेअगोदर कोणत्याही वेळी बँकेस देय असलेल्या सर्व रकमेचा भरणा त्यावरील चार्जेस व खर्चासह करावा.
८. कृपया नोंद घ्यावी की, वरील मागणी सूचना ही कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय आहे व आम्हास देय असलेल्या रकमेसंबंधी अधिक मागण्या करण्याच्या हक्कासह कोणत्याही मर्यादेसह जी आम्हासा आहे त्या कोणतेही अधिकार वा उपायांना सोडून न देता ते वापरले जातील.

**तुमचे विश्वासू,**
**दिनांक : १३-०१-२०२५**
**ठिकाण : वास्को द गामा, गोवा.**
**(श्री. ऑस्टीन जे एम डी आल्मेदा)**
**मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी**

# किरणपाणी विद्यालयनजीक संरक्षक भिंतीचे भूमिपूजन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १८ : पालये किरणपाणी येथील सरकारी प्राथमिक विद्यालयानजीक संरक्षक भिंत व आवारात सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन आमदार जीत आरोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या विकासकामांवर अंदाजे १४.५० लाख रुपये खर्च होणार असून, त्या व्यतिरिक्त विद्यालयाच्या आवारात रेलिंग, पेव्हर्स व अन्य सुविधा उपलब्ध करण्यात येईल, असे आमदार आरोलकर यांनी सांगितले. दरम्यान, चोपडे ते केरी रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून, तत्पूर्वी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पाण्याची वहिनी तसेच पालये ते केरीपर्यंतच्या मार्गात भूमिगत वीज वाहिन्यांचे केबल्स टाकण्यात येईल व त्यानंतर रस्त्याचे काम मार्गी लावले जाईल, असे आमदार आरोलकर यांनी सांगितले.

यावेळी पालये सरपंच स्नेहा गवंडी यांनी आमदार आरोलकर यांच्या सहकार्याने पंचायतक्षेत्रात अनेक कामे मार्गी लागल्याचे सांगितले. केरी सरपंच धरती नागोजी यांनी आमदार आरोलकर यांनी विकास कामाचा धडाका लावल्याबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी पंच राधा परब, रंजना परब, संदीप तिळवे, केरी पंच दर्शना नाईक, जुझे गुदिन्हो , अजय गाड तसेच माजी पंच तातोबा तळकर व अन्य उपस्थित होते. तद्नंतर आमदार जीत आरोलकर यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप केले.

# पार्सेकर महाविद्यालयात गणित कार्यशाळा उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १८ : येथील गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मॅथेमॅटिक्स ट्रेनिंग अँड टॅलेंट सर्च (एमटीटीएस) ट्रस्ट अंतर्गत एमटीटीएस ओव्हरचर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. या कार्यक्रमाचे समन्वयक गणित विभागाचे सहाय्यक प्रा. सुरज परमेकर होते, तर सहाय्यक प्रा. नम्रता खोर्जे आणि सोहम अश्वेकर यांनी सहकार्य केले.

एसटीटीएस प्रशिक्षण अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने २०२३ मध्ये एमटीटीएस ओव्हरचर उपक्रम सुरू करण्यात आला. या अंतर्गत देशभरातील विविध महाविद्यालयांमध्ये दोन दिवसीय कार्यशाळांचे आयोजन केले जाते. प्रत्येक शिबिरात सुमारे ४० स्थानिक पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना अनुभवी एमटीटीएस प्राध्यापक प्रशिक्षण देतात. त्यांना एमटीटीएस शिक्षणपद्धतीशी परिचित करून स्वत: अभ्यास करण्यासाठी विविध स्रोत उपलब्ध करून दिले जातात. २०२३ मधील पायलट प्रकल्पाचा मोठा प्रभाव पडल्यामुळे, एमटीटीएस ट्रस्टने हा उपक्रम नियमित करण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमासाठी प्रमुख संसाधन व्यक्तींमध्ये डॉ. अनंथनारायण हरिहरन, प्रणिल वैकर (सहाय्यक प्राध्यापक, जय हिंद महाविद्यालय, मुंबई), डॉ. हरिता चेरीयथ (स्नातकोत्तर संशोधक, चिली विद्यापीठ) आणि डॉ. अरुषा सी. (स्नातकोत्तर संशोधक, बॉम्बे) यांचा समावेश होता.